RNI No. MAHBIL /2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2014–16

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक ३६] शुक्रवार, जानेवारी ३०, २०१५/माघ १०, शके १९३६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १.—महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश	पृष्ठे १-३

वित्त विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जानेवारी २०१५.

MAHARASHTRA ORDINANCE No. I OF 2015.

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CONTINGENCY FUND ACT.

सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १.

महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९५६ चा ४६. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

त्याअर्थी, आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २०१५, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम २ ची तात्पुरती सुधारणा.

२. या अध्यादेशाच्या अंमलबजावणीच्या कालावधीमध्ये, महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम हा, १९५६ चा ४६. जणूकाही त्यातील कलम २ मध्ये, " रुपये एकशे पन्नास कोटी इतक्या रकमेचा " या मजकुराऐवजी " रुपये दोन हजार एकशे पन्नास कोटी इतक्या रकमेचा " हा मजकूर दाखल करण्यात आला आहे, असे समजून अंमलात येईल.

निवेदन

महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम (१९५६ चा ४६) या अन्वये स्थापन करण्यात आलेल्या व ठेवण्यात आलेल्या राज्याच्या आकस्मिकता निधीची सध्याची मर्यादा रुपये एकशे पन्नास कोटी एवढी आहे.

२. राज्यात २०१४ या वर्षात अपुरा पाऊस पडल्यामुळे, राज्यातील अनेक भागांतील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. राज्य शासनाने, या आधीच पुरवणी मागण्यांद्वारे मदत व पुनर्वसन विभागासाठी रु. २,००० कोटी इतक्या रकमेची तरतूद केलेली आहे. त्या विभागाने, उक्त प्रयोजनांसाठी अतिरिक्त निधीची मागणी केलेली आहे. अजून रु. २,००० कोटी इतक्या अतिरिक्त निधीची तातडीने गरज आहे. याशिवाय, तातडीच्या व अनपेक्षित स्वरूपाच्या खर्चाच्या बाबी उद्‌भवल्यास त्या विवक्षित बाबींचाही खर्च भागवावा लागेल. हा खर्च अनपेक्षित स्वरूपाचा असल्याने, त्याकरिता आवश्यक ती अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध नाही. खर्चाच्या या बाबी " नवीन सेवा " ठरतील आणि म्हणून, त्या राज्य विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे.

राज्य विधानमंडळाचे आगामी अधिवेशन दिनांक ९ मार्च २०१५ रोजी सुरू होणार आहे. वर नमूद केलेल्या प्रयोजनांकरिता निधी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेले आदेश मात्र, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांत पूरक मागण्या व विनियोजन विधेयक संमत करून त्याद्वारे या " नवीन सेवां " वरील खर्च राज्य विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देऊन व ते विधेयक विधानमंडळाचा अधिनियम म्हणून प्रसिद्ध झाल्यानंतरच देता येईल. तथापि, या बाबींवरील खर्च तातडीने करणे आवश्यक असल्यामुळे तो आकस्मिकता निधीमधून आगाऊ रकमा काढूनच भागविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

३. आकस्मिकता निधीची सध्याची मर्यादा फक्त १५० कोटी रुपये एवढी आहे. वर नमूद केलेल्या बाबींवरील खर्च भागविण्यासाठी आणि तसेच, आकस्मिकता निधीमधून भागवणे आवश्यक असलेला अन्य अनपेक्षित व तातडीच्या स्वरूपाच्या बाबींवरील खर्च भागविण्यासाठी उपलब्ध असलेली शिल्लक रक्कम अपुरी आहे. म्हणून, उपरोक्त खर्च भागविण्याकरिता आकस्मिकता निधीच्या सध्याच्या मर्यादेत रुपये २,००० कोटींची तात्पुरती वाढ करून तो निधी रुपये २,१५० कोटी इतका करणे इष्ट आहे, असे वाटते.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही, आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम (१९५६ चा ४६) यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २९ जानेवारी २०१५.

चे. विद्यासागर राव,
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

डॉ. क्षत्रपती शिवाजी,
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.